तरुण भारत संवाद

शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५



# टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालय प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग साळोखेनगर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व पुरुष टेबल टेनिस स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरचा टेबल टेनिस पुरुष संघ अंतिम सामन्यात के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, वर मात करून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. संघाची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे होणाऱ्या इंटरझोनल टेबल टेनिस स्पर्धेकरिता निवड झाली. विवेकानंद महाविद्यालयाच्या संघात अनिष सोनटक्के, भव्य शाह, आदर्श पाटील, ऋषिकेश नलवडे, समर्थ चव्हाण हे विद्यार्थी असुन यशस्वी खेळाडूंचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ.श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर,महाविद्यालयाचे रजिस्ट्रार एस. के धनवडे व श्री सुरेश चरापले यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद
शनिवार, ४ ऑक्टोंबर २०२५

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची 'गोकुळ' प्रकल्पास भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या बी. कॉम. भाग ३ च्या ३५ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या गोकूळ दूध प्रकल्पास औद्योगिक भेट दिली. यावेळी गोकुळ दूध संघाच्या सचिन लोहार व आशुतोष महेकर या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दूध प्रकल्पातील संपूर्ण प्रक्रियेची आणि दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती कशी केली जाते, याबद्दल माहिती दिली. यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. या भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली वाणिज्य् विभाग प्रमुख प्रा सनी काळे यांनी केले होते. यावेळी विद्यार्थ्यासमवेत डॉ. अमोल मोहिते, प्रा. ओंकार कुलकर्णी उपस्थित होते.







१) कोल्हापूर : मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या १९ वयोगटातील विजेत्या मुलांचा विवेकानंद कॉलेजचा संघ. २) १४ वयोगटातील महाराष्ट्र हायस्कूलच्या मुलींचा संघ. सोबत मान्यवर, संयोजक, प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# विवेकानंद कॉलेजला दुहेरी मुकुट

## मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा; मुलींत महाराष्ट्र हायस्कूल विजेता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मनपा प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या १९ वयोगटात विवेकानंद कॉलेजने दुहेरी मुकुट पटकाविला. १४ वयोगट मुलींत महाराष्ट्र हायस्कूल संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचा प्रारंभ शुक्रवारी शिवाजी पेठेतील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या मैदानावर प्रारंभ झाला. संयोजन क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, क्रीडा शिक्षक संदीप पाटील आणि कोल्हापूर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने करण्यात आले.

१४ वयोगट मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र हायस्कूलने गुरुदेव विद्यानिकेतनचा ३-२ असा पराभव केला. विजयी संघात अंतरा व्हरकट, आराध्या वाळवेकर, हिना मुल्ला, वृंदा शिंदे, रुद्राक्षी शिंदे, भूमिका पाटील, परिणीता यादव, ज्ञानेश्वरी पाटील, आराध्या लिगाडे, आदिती शिंदे, आकांक्षा पवार, यशस्वी राजमाने यांचा समावेश आहे.

१९ वयोगट मुलींच्या अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने महाराष्ट्र हायस्कूलचा २-० असा पराभव केला. विजयी संघात अदिती मस्के, रिया गवळी, संचिता पाटील, श्रावणी हिप्परगे, तनिष्का पाटील, ऋत्वी पाटील, साक्षी हवलदार, विविका कदम, समृद्धी कोळी, समृद्धी भोसले यांचा समावेश आहे. मुलांच्या गटात विवेकानंद कॉलेजने महावीर कॉलेजचा २-० ने पराभव केला. विजयी संघात ओंकार कडपट्टी, मंत्र लोहार, यश पाटील, स्वयम पाटील, हर्ष सुतार, सर्वेश पाटील, मयुरेश काशीद, अथर्व पोवार, अभिषेक सोनुले, पृथ्वीराज मालिकवाडे, समर्थ भोसले, आदित्य चव्हाण यांचा समावेश आहे.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५

## विवेकानंद महाविद्यालय

विवेकानंद महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महात्मा गांधीजींच्या व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे गणित विभागप्रमुख डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. दत्ता जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागातर्फे करण्यात आले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

• शनिवार
दि ४ ऑक्टोबर २०२५

# विवेकानंदमध्ये महात्मा गांधी, लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन



राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना डॉ. दत्ता जाधव. सोबत डॉ. दत्ता जाधव आदी.

जनप्रवास : कोल्हापूर

विवेकानंद महाविदयालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते फोटोपूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. दत्ता जाधव यांनी केले.

जाधव म्हणाले, सत्यू, अहिसा, सत्याग्रह या संकल्पना जगासमोर मांडल्या. या तत्वांना महात्मा गांधी यांनी जीवनात खूप महत्व दिले. धर्मनिरपेक्षता आणि मानवता याचबरोबर संघटितपणा यासाठी महात्मा गांधी यांनी विचारसरणी आजही उपयुक्त आहे. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यानी जय जवान जय किसान हा नारा देऊन संपूर्ण शेतकऱ्यांना सबल करण्याचे कार्य केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.